


॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

मंगल देशा! पवित्र देशा!
महाराष्ट्र देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा,
श्री महाराष्ट्र देशा ॥

महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

▪ अहिल्यानगर ▪ गुरुवार, दि. १ मे २०२५ ▪ वर्ष ६ वे ▪ अंक २१ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ▪ 9420802145


## उद्या अंक नाही

गुरुवार, दि. १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त वीरभूमी कार्यालयास सुट्टी असल्याने शुक्रवार, दि. २ मे २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते, एजंट, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

\- संपादक

# देशात जातनिहाय जनगणना होणार

## केंद्रीय मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत निर्णय

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेट तसेच राजकीय प्रकरणांशी संबंधित कॅबिनेट समितीची बैठक बुधवारी झाली. यावेळी जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला. अनेक दिवसांपासून देशात जनगणना घेण्यासोबतच जातनिहाय जनगणना घेण्याची मागणी होत होती.

बुधवार सकाळपासूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी बैठकांवर बैठका घेत आहेत. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तान विरोधात करायच्या कारवाईवरून सातत्याने बैठका सुरू आहेत. अशातच केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक देखील बुधवारी घेण्यात आली. त्यात जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

देशभरात जनगणना करण्यात येईल तेव्हा त्यात हा जातीय जनगणनेचा आकडा देखील जोडला जाईल. थोडक्यात, जनगणनेच्या फॉर्ममध्ये येथून पुढे जातीचा कॉलम असेल. त्याच आधारावर देशातील जातनिहाय लोकसंख्या कळेल. काँग्रेस खासदार राहुल गांधी तर समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव असे नेते सातत्याने जातनिहाय जनगणनेची मागणी करत होते.

जातनिहाय जनगणनेमुळे साधन संपत्तीचे योग्य वाटप, आरक्षण तसेच अन्य लाभ



देण्याबाबत धोरण ठरवण्यासाठी मदत होते. आम्ही सत्तेत आलो तर जातनिहाय जनगणना करू असे राहुल गांधी यांनी लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी अनेकदा सांगितले होते. तसेच आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा संपुष्टात आणू असेही त्यांनी म्हटले होते. या सगळ्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेणे म्हणजे विरोधकांवर कुरघोडी मानली जात आहे.

बुधवारी झालेल्या कॅबिनेट मीटिंगनंतर केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याची सविस्तर माहिती दिली. मोदी सरकारने समाजातील प्रत्येक घटकाच्या हितासाठी पावले उचलली आहेत.

बिहारमध्ये लवकरच विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्याआधीच केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे याचा फायदा त्यांना या निवडणुकीत होण्याचा अंदाज बांधला जात आहे. आतापर्यंत याचे श्रेय राहुल गांधी यांना दिले जात होते, पण या निर्णयामुळे आता याचा फोकस बदलला जाऊ शकतो.

अश्विनी वैष्णव म्हणाले की, काँग्रेसने नेहमीच जातनिहाय जनगणनेचा विरोध केला आहे. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २०१० मध्ये संसदेतच सांगितले होते की, या जातनिहाय जनगणनेवर विचार केला जाईल. मात्र, त्यावर काही निर्णय झालेला नव्हता. कोणत्याही निर्णयाप्रत न येऊनही या लोकसभा निवडणुकीत पुन्हा एकदा इंडिया आघाडीने याचे भांडवल करण्याचा प्रयत्न केला. अनेक राज्यांनी जातनिहाय जनगणना केली आहे. मात्र, हा केंद्राच्या अखत्यारीतला विषय आहे. काही राज्यांनी याबाबत चांगले काम केले आहे, असे वैष्णव म्हणाले. तर काही राज्यांमध्ये यात गोंधळ झाल्याचे जाणवते.

# मनोज जरांगे पाटील पुढचे आमरण उपोषण मुंबईत करणार

**● बीड । वीरभूमी–**

आतापर्यंत संयमाने घेतले, पण सरकारने १०० टक्के आपली फसवणूक केली.', असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी पुढच्या आंदोलनाबाबत मोठी घोषणा केली. आता मुंबईत २९ ऑगस्ट २०२५ ला आमरण उपोषण होणार असे म्हणत मनोज जरांगेंनी उपोषणाची तारीख देखील सांगितली. मनोज जरांगे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी मराठा आरक्षणाबाबत सरकारने फसवणूक केल्याचे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांच्यावर जोरदार टीका केली.

मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले की, 'प्रथम सरकारचे कौतुक आहे. दोन वर्षे झाले तरीही आम्ही संयमाने घेत आहोत. मागील उपोषण सोडताना चार मागण्यांची तात्काळ अंमलबजावणी केली जाईल असे सांगितले होते. आज तीन महिने पूर्ण झाले कुठल्याही मागण्यांची अंमलबजावणी झाली नाही.

जरांगेंनी यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर देखील टीका केली. ते म्हणाले की, मराठा आणि कुणबी एकच आहे याचा अध्यादेश काढा. विद्यार्थ्यांनी नेत्यांचे ऐकून शिक्षणात जातिवाद आणू नका. आम्ही जातिवाद करत नाही. सरकारकडे मागणी आहे की सगळे गुन्हे सरसकट मागे घ्या. माझ्यावर हल्ला करायचा. मला मारायचे आहे. आता मी दारात आहे देवेंद्र फडणवीस साहेब तुमच्या. मी २९ ऑगस्टला तुमच्या दारात येत आहे. तुम्हाला जे करायचे ते करा. मला फक्त २८ ला सोडायला पोरं येतील. २९ ला ते परत जातील. २८ ऑगस्टच्या आधी सगळ्या मागण्या मंजूर झाल्या पाहिजेत. आमच्या संयमाचा अंत बघू नका फडणवीससाहेब.

तसेच, 'सगे सोयऱ्याच्या अधिसूचनेला दीड वर्ष पूर्ण झाले आहे. पुढील आंदोलनाची दिशा १ ऑगस्ट रोजी सांगणार आहे. सरकारने आपली शंभर टक्के फसवणूक केली. आमच्या ज्या मागण्या आहेत त्या तुमच्या पाठ झाल्या आहते. यावर सरकारची पीएच.डी झाली आहे. शिंदे समितीने काम केले. आमच्या नोंदी नाहीत म्हणले होते. तुम्ही त्या नोंदी शोधल्या त्यामुळे सरकारचे कौतुक केले. आमच्या कुणबी नोंदी सापडल्या. जो अधिकारी कुणबी प्रमाणपत्र देत नसेल त्याला तात्काळ निलंबित करून टाका, अशी मागणी जरांगेंनी केली आहे.

## SPOT NEWS



### कुकडी आवर्तनासाठी ५ मे रोजी नगरमध्ये बैठक

**● श्रीगोंदा –** कुकडी प्रकल्पाच्या उन्हाळी हंगाम २०२४-२५ च्या नियोजनासाठी कालवा सल्लागार समितीची बैठक सोमवार दि. ५ मे २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात (नियोजन भवन) आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या उपस्थितीत व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे, अशी माहिती कालवा सल्लागार समितीचे सदस्य सचिव व कुकडी सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता सं. मा. सांगळे यांनी दिली आहे.

### अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर हळदीला विक्रमी भाव

**● मुंबई –** अक्षय्य तृतीयेच्या दिवशी प्रामुख्याने सांगली जिल्ह्यात हळदीचे सौदे करण्यात येत असतात. त्यानुसार सांगली कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारामध्ये आज अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर हळदीचे सौदे पार पडले. यावेळी हळदीला १५ हजार ५०० ते १५ हजार रुपये इतका विक्रमी भाव मिळाला आहे. आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणात हळद बाजारपेठेमध्ये दाखल झाली होती. सांगली जिल्ह्यात हळदीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जात असते. हळद काढणी झाल्यानंतर अक्षय्य तृतीयेला बाजार समितीमध्ये लिलाव पद्धतीने सौदे करण्यात येत असतात. त्यानुसार सांगलीच्या कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात हळद विक्रीसाठी आणली होती. त्यानुसार बाजार समितीमध्ये आज हळदीची सुमारे १४ हजार क्विंटल इतकी आवक झाली होती. तर यंदाचा ९० टक्के सिझन पूर्ण झाला आहे.

# नगर शहरात आयपीएल सामन्यावर सट्टा लावणारा पोलिसांच्या जाळ्यात

**● नगर । वीरभूमी–**

कायनेटीक चौकातील स्वप्निल साईसुर्या परमीट रूम अ‍ॅण्ड फॅमिली रेस्टॉरन्ट येथे शहर पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांच्या पथकाने छापा टाकून आयपीएल सामन्यावर सट्टा (बेटिंग) लावत असलेल्या एकाला पकडले. शुभम दत्तात्रय भगत (वय ३२ रा. जे. जे. गल्ली, मंगलगेट) असे त्याचे नाव आहे.मंगळवारी (२९ एप्रिल) रात्री दिल्ली कॅपिटल्स विरूध्द कोलकत्ता नाईट रायडर्स यांच्यात सुरू असलेल्या सामन्यादरम्यान पोलिसांनी ही कारवाई केली. पोलीस अंमलदार सचिन जाधव यांच्या फिर्यादीवरून शुभम भगत विरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्या ताब्यातून मोबाईल, सिमकार्ड, बनावट आधारकार्ड असा १६ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी केलेल्य प्राथमिक तपासात शुभम भगत याने स्वतःच्या मोबाईलवर २३ आयडी तयार करून, त्याचप्रमाणे १६ मोबाईल नंबरच्या माध्यमातून सट्टा लावत असल्याचे उघड झाले.

त्याने आयपीएल क्रिकेट बेटिंगसाठी चार मोबाईल हॅण्डसेट, स्वत:चे व बनावट दुसर्यांच्या नावाचे दोन आधार कार्ड, बुकी संपर्क यादी आणि कॉलिंग आयडी यादी वापरल्याचे निष्पन्न झाले. यापैकी दोन सिमकार्ड खोटी ओळख दर्शवून घेतल्याचेही तपासात स्पष्ट झाले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांच्या सुचनेनुसार आणि उपअधीक्षक अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय शिंदे, अंमलदार सुयोग सुपेकर, सचिन जाधव, किरण बनसोडे, हेमंत खंडागळे, सागर व्दारके यांनी सहभाग घेतला. सदर गुन्ह्याचा पुढील तपास उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड हे करत आहेत.






# शहरामध्ये पाच कॅफेवर पोलिसांचा छापा

**● नगर । वीरभूमी –**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीतील नगर – कल्याण रोडवरील द परफेक्ट कॅफे, सारसनगर ते वाकोडी जाणारे रोडलगत बेलाचाव कॅफे, तोफखाना पोलीस स्टेशन हद्दीतील सावेडी गावातील पंपींग स्टेशनजवळील ऑरिगेनो कॅफे, कोहिनूर मॉलजवळील झेडके कॅफे व भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीतील स्टेट बँक चौक, अहिल्यानगर येथील वननेस कॅफे अशा ठिकाणी पंचासमक्ष जावुन खात्री केली असता तरुण मुल मुली अश्लील चाळे करताना मिळुन आले.

पथकाने वर नमूद कॅफे चालकास कॅफे चालविण्याचा परवाना बाबत विचारपुस करता त्यांनी कॉफी शॉपचा परवाना नसताना कॉफी शॉपचा बोर्ड लावुन कुठलीही कॉफी, पेय अगर खाद्यपदार्थ विक्रीस न ठेवता आतमध्ये मुलामुलींना बसण्यासाठी व अश्लिल चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कॅफे चालक महेश पोपट खराडे (वय २३, रा.नालेगाव), आसिफ आयाज शेख (वय २६, रा. भोसले आखाडा, बुरूडगाव), विशाल विष्णु वाघ (वय १८, रा. बुरूडगाव रोड, अहिल्यानगर), मंगेश भरत आजबे (वय १९, रा. बुरूडगाव रोड), महेश शंकर दरंदले (रा. चिपाडे मळा, अहिल्यानगर), अविनाश विलास ताठे (वय ३२, रा. ताठेनगर, सावेडी), मंगेश रमेश देठे (वय १९, रा. भगवती कोल्हार, ता. राहाता), महेश सातपुते (रा. अहिल्यानगर), कृष्णा अनिल कराळे (वय १९, रा. तपोवन रोड) यांचेविरूध्द कारवाई करुन कोतवाली, तोफखाना व भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२९, १३१ (क) प्रमाणे ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पथकाने वर नमुद कॅफेमध्ये मिळुन आलेल्या तरुण मुला मुलींना समज देऊन सोडून देण्यात आले आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

# SPOT NEWS

## पाथर्डीत ८ मे ते २३ मे अक्षर संस्कार शिबिराचे आयोजन

● **पाथर्डी । वीरभूमी-**

वसंतराव नाईक वाचन मंदिर या संस्थेच्या वतीने शालेय विध्यार्थ्यांसाठी ८ मे पासून २३ मे या कालावधीत दररोज सायं. ६.०० ते ७.०० या वेळेत अक्षर संस्कार शिबीर-२०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती शिबीर समन्वयक निसर्गकवी सचिन चव्हाण यांनी दिली आहे. पाथर्डी शहरातील आनंदनगर येथील श्री सद्‌गुरू संत सेवादास महाराज मंदिर सभागृहात या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून शालेय विदयार्थ्यांना बेसिक कॅलिग्राफी व सुंदर हस्ताक्षर सराव मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शिबिरात सहभागी विदयार्थ्यांना कॅलिग्राफी पेन मार्गदर्शक पुस्तिका व शैक्षणिक साहित्य मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संस्थेचे अध्यक्ष विष्णुपंत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून प्रा.सूर्यकांत काळोखे, गणेश कांबळे, संदीप राठोड, शिवाजी चव्हाण, विठ्ठल पवार हे विद्यार्थ्यांना अतिरिक्त मार्गदर्शन करणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांना या शिबिरात सहभागी व्हायचे असेल त्यांनी चव्हाण सर यांच्या या मोबाईल नंबरवर ९४०५२६८८९४ व ९०७०८५६०४३ वर संपर्क करावा.

## कल्पना घडेकर यांना पीएचडी पदवी प्रदान

● **नगर । वीरभूमी-**



येथील रक्षिता महिला मंचच्या संस्थापिका कल्पना अशोक घडेकर-कारले यांना भारत सरकारच्या नीती आयोग, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय तसेच सूक्ष्म व लघु उद्योग मंत्रालय आणि आयर्लंड क्रेडेशन फोरमच्या वतीने प्रमाणित लिजेंड्री पीस अवॉर्ड कौन्सिल या शैक्षणिक विद्यापीठाची अबॅकस या गणितीय संकल्पनेतील मोजणीमधील हातच्याची अडचण सोडवणाऱ्या क्रांतीकारी संशोधनाबद्दल केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील पहिली पीएचडी प्राप्त करण्याचा मान प्राप्त झाला आहे. येत्या आठवड्यात नवी दिल्ली येथील कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे शानदार समारंभात मान्यवरांच्या शुभहस्ते घडेकर यांना ही पदवी प्रदान केली जाणार असून, अबॅकसमधील विस्तृत नवसंशोधन कार्य हे सुमारे ३७ नाविन्यपूर्ण संकल्पनांचे संशोधन त्यांनी विद्यापीठीय समितीला सादर केले होते. गेल्या पंचवीस वर्षांपासून भारतासह सुमारे ४५ देशांमध्ये शाखा असणाऱ्या एवरेस्ट अबॅकस अकॅडमीसाठी सौ.घडेकर अबॅकस मार्गदर्शिका म्हणून काम करत आहेत. विद्यार्थ्यांना आकडेमोड करत असताना होणाऱ्या चुकांची अनेक कारणे शोधून उलटी गुणाकार करण्याची पद्धत, भागाकाराची क्लिष्ट पद्धत, अबॅकस पाटीवर मधल्या रॉडवर बेरीज आणि वजाबाकी करण्याची पद्धत यामध्ये घडेकर यांनी संशोधनातून विविध उपाय करून विविध बदल केल्यानंतर विद्यार्थ्यांचे आकडेमोड करण्याची गती वाढवली. शिवाय संख्या वाचण्यात गफलत होत होती. त्यापासून विद्यार्थ्यांना सुटका मिळाली. या संशोधनामुळे कमीत कमी वेळात विद्यार्थी अचूक उत्तरे देऊ लागली. अबॅकसवर आकडेमोड करताना पूर्वी जो गोंधळ होत होता तो गोंधळ पूर्णपणे थांबला. क्लिष्ट पद्धती नष्ट होऊन विद्यार्थी हसत खेळत अबॅकसचा उपयोग करू लागले. परिणामी पालकांचा व विद्यार्थ्यांचा अबॅकस वरील विश्वास वाढला. अबॅकसवर आकडेमोड करण्याच्या वरील पद्धती सर्वमान्य होऊन राज्य, देश तथा जगभरातील विविध अबॅकस अकॅडमींनी वरील पद्धतीचा स्वीकार केला. या सर्व संशोधनांचा समितीने सखोल अभ्यास केला. भारतातील अबॅकसमधली पहिली पीएचडी मिळवताना गेल्या दोन ते तीन दशकांच्या मेहनतीला यश आले आहे. भारतीय शिक्षण पद्धतीतील गणितासाठी अबॅकस महत्त्वाची संकल्पना असल्यामुळे त्यातील माझे नवसंशोधन हे निश्चितच शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे. या संशोधनामध्ये एवरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या शिक्षिका व विद्यार्थी यांची मोलाची मदत झाली. देशातील १०० टक्के शाळांमध्ये अबॅकस शिकवले जावे. असे प्रतिपादन घडेकर यांनी केले.

# हनुमंतरायांची भक्ती म्हणजे प्रभु श्रीराम-सीतामातेची भक्ती

### आ. मोनिकाताई राजळे । कासार पिंपळगाव येथे ग्रामदैवत पावन हनुमान मंदिर जिर्णोद्धाराचे भूमिपुजन

● **पाथर्डी । वीरभूमी-**



भगवान श्रीराम व सीतामाता यांची भक्ती करणाऱ्या हनुमंतरायांची भक्ती करणे म्हणजे प्रभू श्रीराम व सीतामाता यांची भक्ती करण्याचे भाग्य लाभते. ग्रामस्थांनी ग्रामदैवत श्री पावन हनुमान मंदिर व बिरोबा मंदिर जिर्णोद्धाराचे काम लोकवर्गणीतून हाती घेतले आहे. यासाठी प्रत्येकाने आपआपल्या परीने मदत करण्याचे जाहीर केले आहे. यामुळे लवकरच भव्यदिव्य मंदिर निर्माण होईल, असा विश्वास आ. मोनिकाताई राजळे यांनी व्यक्त केला.

पाथर्डी तालुक्यातील कासार पिंपळगाव येथील ग्रामदैवत श्री पावन हनुमान मंदिर जिर्णोद्धाराचे भूमिपुजन हनुमान टाकळी येथील समर्थ हनुमान देवस्थानचे महंत रमेश आप्पा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात आ. राजळे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. भाऊपाटील राजळे हे होते.

यावेळी पाथर्डी बाजार समितीचे सभापती सुभाष बर्डे, ह.भ.प. हरिश्चंद्र दगडखैर महाराज, ह.भ.प. नानाभाऊ देशमुख, माजी जि. प. सदस्य राहुलदादा राजळे, सरपंच मोनालीताई राजळे, उपसरपंच आशाबाई तिजोरे, मुरलीधर भगत, शिल्पकार हनुमंत फाजगे, सेवा संस्थेचे उपाध्यक्ष संभाजी राजळे, ग्रामपंचायत सदस्य अंकुश राजळे, आप्पासाहेब राजळे, गोरक्ष राजळे, शिवाजी भगत, तात्यासाहेब भगत आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. मोनिकाताई राजळे म्हणाल्या, अनेक गावातील मंदिराचा लोकसहभागातून जिर्णोद्धार झाला आहे. शेजारील श्रीक्षेत्र हनुमान टाकळी येथे समर्थ हनुमानाचे भव्य दिव्य मंदिर लोकसहभागातून उभारले आहे. जवखेडे येथील मंदिराचाही जिर्णोद्धार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कासार पिंपळगावचे ग्रामदैवत श्री पावन हनुमान मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचा निर्णय कौतुकास्पद आहे. यासाठी मागील काही दिवसापासून सरपंच मोनालीताई राजळे यांनी ग्रामस्त, तरुणांना सोबत घेत गावातील प्रत्येक घरी जावून लोकवर्गणी जमा करण्याचे काम सुरु केले आहे. यामध्ये प्रत्येकाने आपल्या परीने आर्थीक व इतर मदत करण्याचे जाहीर केले आहे. यामुळे लवकरच भव्य दिव्य मंदिर उभारले जावून गावच्या धार्मीक वैभवात भर पडेल, असा विश्वास व्यक्त केला.

प्रारंभी पंचायत समितीचे शाखा अभियंता राम राजळे व त्यांच्या सुविद्य पत्नी यांच्या हस्ते श्री पावन हनुमान मंदिर भुमिपूजन पुजा करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुण्यांसह गावातील प्रत्येक कुटुंबातील सदस्यांच्या हस्ते मंदिर भूमिपुजनाचा नारळ वाढविण्यात आला. यावेळी मंदिर जिर्णोद्धारासाठी अनेकांनी चेक व रोख स्वरुपात आपली वर्गणी जमा केली. यामध्ये दादासाहेब पवार (५१ हजार रुपये), शिवाजी भगत (एक लाख रुपये), ज्ञानदेव जगताप (५१ हजार रुपये), गोरक्ष राजळे (५१ हजार रुपये), काशिनाथ कराळे (११ हजार रुपये), बाजार समितीचे सभापती सुभाष बर्डे (११ हजार रुपये), देविदास राजळे (११ हजार रुपये), महादेव राजळे (११ हजार रुपये), गणेश चितळे (५५०० रुपये), आसाराम पठाडे (१५ हजार रुपये), दत्तात्रय राजळे (५ हजार रुपये) अशी एकुण तीन लाख २२ हजार ५०० रुपये जमा झाले. तर श्रीराम राजळे यांनी ५०० सिमेंट गोणी आणि संतोष शेळके यांनी मंदिराचे संपूर्ण साहित्यासह लाईट फिटींग करुन देण्याचे जाहीर केले. या देणगीदारांचा आ. राजळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आर. वाय. म्हस्के यांनी केले. सूत्रसंचलन तुषार तुपे यांनी केले तर जिर्णोद्धार समितीचे सचिव सुधीर शेळके यांनी आभार मानले. यावेळी सर्व ग्रामस्थ, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रमुख पाहुण्यांकडूनही मंदिरासाठी देणगी जाहीर

■ श्री पावन हनुमान मंदिर जिर्णोद्धार भूमिपुजन कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले पाहुणे महंत रमेश आप्पा व बाजार समितीचे सभापती सुभाष बर्डे यांनी प्रत्येकी ११ हजार रुपये देणगी देण्याचे जाहीर केले. तर आ. मोनिकाताई राजळे यांनी राजळे कुटुंबाच्यावतीने ५ लाख रुपये तर सरपंच मोनालीताई राजळे यांचे बंधू अभिजीत येवले (संगमनेर) यांनी वडील कै. रावसाहेब कारभारी येवले यांच्या स्मरणार्थ ५ लाख रुपये व आसाराम काकडे यांनी वडील कै. किसन काकडे यांच्या स्मरणार्थ एक लाख ५१ हजार रुपये देणगी देण्याचे जाहीर केले.

## संगमनेरात आज समतेची मिसळ कार्यक्रम

● **संगमनेर । वीरभूमी-**



हिंदवी स्वराज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले शाहू महाराज व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समतेचा विचार घेऊन संगमनेर मध्ये १८५७ पासून सामाजिक सलोख्याचे व बंधुभावाचे वातावरण वाढीस हाच विचार अधिक बळकट करण्यासाठी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली शहर व तालुक्यातील सर्व समाज एकत्र येऊन उद्या महाराष्ट्र दिनानिमित्त समतेची मिसळ हा कार्यक्रम करणार असून यामध्ये शहर व तालुक्यातील सुमारे १० हजार नागरिक सहभागी होणार आहेत.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुका हा एक परिवार म्हणून ओळखला जातो. १८५७ पासून संगमनेर मध्ये एकत्रितपणे येऊन विविध उपक्रम साजरी करण्याची परंपरा आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही अनेक वेळा सर्व संगमनेरकरांनी एकत्र येऊन आनंद उत्सव साजरा केला आहे.

युवक नेत्या कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून संगमनेर शहर व तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी एकत्र येऊन समतेची मिसळ हा कार्यक्रम नियोजित केला आहे.यासाठी लागणाऱ्या विविध वस्तू विविध समाजांनी स्वीकारले असून त्या सर्व एकत्रित करून सुमारे दहा हजार संगमनेर करांना मिसळीचा आस्वाद दिला जाणार आहे.

गुरुवार दि. १ मे २०२५ रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत नवीन नगर रोड येथे समतेची मिसळ हा कार्यक्रम होणार आहे. यासाठी शहरातील सर्व समाजातील लोक एकत्र झाले असून या कार्यक्रमाची जय्यत तयारी करत आहे.

मिसळ साठी लागणारे पाव, फरसाण, कांदा, शेंगदाणे, तेल, पाणी बॉटल यांसह विविध साहित्य संगमनेर मधील विविध समाजाच्या कार्यकर्त्यांनी यशोधन कार्यालयात मोठ्या संख्येने जमा केले यावेळी महिलांचा मोठा सहभाग हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

तरी शहरातील सर्व नागरिक, महिला, युवक, ज्येष्ठ, बालक, विद्यार्थी या सर्वांनी या समतेच्या मिसळ कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन सामाजिक सलोखा व सर्वधर्मसमभाव ही महाराष्ट्राची परंपरा अधिक समृद्ध करण्यासाठी सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. जयश्रीताई थोरात व विविध सामाजिक संघटना आणि सर्व समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मढेवडगावची तरुणी झाली थेट लष्करी पोलिस सैन्य तुकडीत भरती

● **श्रीगोंदा । वीरभूमी-**




मढेवडगाव येथील शेतकरी दत्तात्रय रामभाऊ वाबळे यांची कन्या कु. दिव्या दत्तात्रय वाबळे हिची भारतीय सेनेतील कॉर्पस ऑफ मिलिटरी पोलीस विभागात निवड झाली आहे. दिव्या सध्या बंगळुरू येथे प्रशिक्षण घेत आहे. मढेवडगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या विद्यालयात तिचे दहावीपर्यंत शिक्षण झाले. शालेय जीवनात दिव्या हिने अनेक स्पर्धांमध्ये थलिट म्हणून यशस्वी खेळाडूची कामगिरी केली होती.

पुढील शिक्षणासाठी पुण्यातील महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर मुळची थलिट असल्याने ती रोज डेक्कन जिम खाना येथे थलेटिक्सचा सराव करत होती. गेल्या दोन वर्षांपासून सैन्यदलात भरतीसाठी प्रयत्न करीत होती. यात तिला हुलकावणी देत होते. याचवेळी दिव्याने अहिल्यानगर येथील एमआयआरसी सेंटरमध्ये झालेल्या भरतीत नशीब आजमावण्याचा प्रयत्न केला. यात तिची शारीरिक, क्रीडा व बौद्धिक गुणवत्ता पाहून तिची निवड झाली.

तिच्या यशामागे शालेय शिक्षक, गावातील आजी- माजी सैनिक संघटनेने तिला मोलाची साथ दिली. दिव्याच्या यशामुळे आजी - माजी सैनिक संघटनेला समाधान वाटले. ही संघटना गेल्या दोन वर्षापासून गावातील मुला- मुलींना भरतीसाठी मार्गदर्शन करीत असून त्यांच्या प्रशिक्षण व मोलाच्या साथीमुळे दोन वर्षात गावातील २ मुली व ३ मुलांची देशसेवा करण्यासाठी भारतीय सैन्यदलात निवड झाली आहे. या यशामुळे दिव्या हिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## ढवळपुरी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धा परीक्षेत उज्वल यश

● **पारनेर । वीरभूमी-**



अश्विन गिरवाल | सुयश पाचारणे | दिक्षांत भालेराव | अवंती पोपळघट | अनुश्री बांगर

पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील प्राथमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळवून उत्तुंग अशी कामगिरी केली. नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, मंथन स्पर्धा परीक्षा, लक्षवेध परीक्षा, एक्सलंट ऑलिम्पियाड परीक्षा आदींमध्ये विद्यार्थ्यांनी राज्यस्तर व जिल्हास्तरावर क्रमांक मिळवून मोठे यश मिळविले आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेत अश्विन संजय गिरवाल, सुरेश लक्ष्मण पाचारणे, अन्विता राजाराम वाघ, प्रतिक काशिनाथ बाचकर, आरव विजय वाघ, कृष्णा अनिल बिडे, गायत्री किसन वाघ, कुणाल मच्छिंद्र चितळकर, कार्तिक राजू थोरात, संचित बबन ठोकळ, माही खलिल शेख, गौरी राजेंद्र बुचुडे, आराध्या अनिल कपाटे, साई आप्पासाहेब वाबळे, श्रेयश सोपान सासवडे हे पात्र झाले आहेत.

तर नवोदय विद्यालय परीक्षेत वरील सर्व विद्यार्थ्यांबरोबरच खुशी दीपक चितळकर, स्नेहा शरद चितळकर, संघर्ष अंबादास खेडकर, श्रेया पंकज डोळझाके, सत्यजित कैलास थोरात उत्तीर्ण झाले.

इयत्ता चौथी लक्षवेध व एक्सलंट ऑलिम्पियाड परीक्षेत आदिथ सुरेश थोरात, भिवा भागा झिटे, कनिष्का बाळासाहेब भालेराव, विनय संजय गिरवाल, अविराज स्वप्निल बुळे, कृष्णा मच्छिंद्रनाथ वाव्हळ, इयत्ता तिसरी लक्षवेध व मंथन परीक्षेत दिक्षांत विशाल भालेराव, अवंती जितेंद्र पोपळघट, अमर सागर शिंदे, रमेश राजू माने, साई पंकज डोळझाके, आदित्य सुधाकर चव्हाण, समृद्धी अंबादास खेडकर, तन्वी राहुल जाधव, सचिन दत्ता झिटे, आरोही संदीप वाघ, साईराज संदिप बुचुडे, रणजीत कैलास थोरात, शिवांश सुनील राजापुरे, प्रेरणा भाऊसाहेब भुसारी, वेदांत संजय भांड, प्राजक्ता गणेश भालेराव, श्रावणी किरण पवार, परी संदीप साठे, संस्कृती राहुल जाधव.

इयत्ता पहिली एक्सलंट ऑलिम्पियाड परीक्षेत अनुश्री अमोल बांगर, अर्णव संतोष वावळ, मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत स्वरांजली नानासाहेब बुचडे, इयत्ता सातवी मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत ईश्वरी अंकुश चितळकर पात्र ठरल्या आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष शाहिद काझी, सचिव रेहान काझी, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक विनोद लोंढे, निरीक्षक तुकाराम कातकडे, गटशिक्षणाधिकारी सिमा राणे, सरपंच नंदाताई भागाजी गावडे, उपसरपंच बबन पवार, सेवा सोसायटीचे चेअरमन भागाजी गावडे, माजी सरपंच डॉ. राजेश भनगडे, शिक्षण विस्तार अधिकारी कांतीलाल ढवळे, केंद्रप्रमुख राजेंद्र शिंदे, सुखदेव चितळकर, राजेंद्र भालेराव, चंद्रकांत भालेराव, आजी माजी ग्रामपंचायत सदस्य व सेवा सोसायटी सदस्य, मुख्याध्यापक संदीप महांडुळे, प्राचार्य बापूसाहेब रूपनर, शिक्षक व पालक, माजी विद्यार्थी यांनी हार्दिक अभिनंदन केले.

## उपअभियंता आजिनाथ खेडकर यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

● **नगर । वीरभूमी-**



जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग अहिल्यानगर येथे कार्यरत उपअभियंता अजिनाथ खेडकर यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त झालेले खेडकर यांच्या सेवापूर्तीचा जिल्हा परिषद बांधकाम विभाग येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी होले, अभियंता हर्षल काकडे, किरण कदम, उपअभियंता अजीनाथ खेडकर, पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात, वरिष्ठ लिपिक श्रीमती सप्तर्षी आदींसह कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

होले म्हणाले की, उपअभियंता अजिनाथ खेडकर यांनी आपल्या कामाशी प्रामाणिक राहून कार्य केले. त्यांनी सेवाकाळात नगर तालुका, राहुरी, पाथर्डी, शेवगाव, नेवासा या तालुकाच्या ठिकाणी अनेक योजना यशस्वीपणे राबवल्या ग्रामीण भागात कामे करताना त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम केले. ते एक कुशल अभियंता असून त्यांनी त्यांच्या कामाच्या माध्यमातून सार्वजनिक बांधकाम विभागात नावलौकिक मिळवून दिल्याचे त्यांनी सांगितले.

उपअभियंता अजीनाथ खेडकर म्हणाले की, लोभ आणि चंगळवादाला बळी पडलेले लोक दिव्य लोकातही सुख प्राप्त करू शकत नाही. तर पृथ्वीतलावरील लोकांची काय कथा! भौतिक क्षणिक सुखा सारखी या जगात दुसरी विपत्ती नाही. भौतिक सुख मोह माये समान आहे. आणि भौतिक सुखाने ग्रस्त लोक विषय सुखाचे दास होतात. परंतु सत्याची जाणीव झाल्यास विषय सुखाचे भय वाटते, म्हणून सुज्ञ माणसाने भौतिक सुखाची कामना करू नये असे त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना अजिनाथ खेडकर म्हणाले की, शासनाने आपल्यावर टाकलेल्या जबाबदारीचे भान ठेऊन लोककार्यासाठी काम केले तर अडचण येणार नाही. लोकसेवेत काम करताना सामाजिक बांधिलकी जोपासून योगदान दिल्यास त्या कामाला यश मिळणार आहे. हे मी माझ्या सेवाकार्यात अनुभवले असल्याचे त्यांनी सांगितले.

# SPOT NEWS



## अचीवर्स स्पोर्ट्स अकॅडमी ठरली सांघिक व कुमिते ट्रॉफीची मानकरी

**● नगर । वीरभूमी–**

बारामती येथे नुकत्याच पार पडलेल्या ५ व्या महाराष्ट्र कराटे चॅम्पियन लिग स्पर्धेमध्ये अचीवर्स स्पोर्ट्स अकॅडमी च्या ५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून चि.अथर्व निलेश बेद्रे या खेळाडूला रु. १० हजार किमतीची (अरवजा) कुमिते किट बक्षीस स्वरुपात देण्यात आली तसेच अकॅडमीतील बेस्ट प्लेयर ऑफ द चॅम्पियनशिप म्हणून समर्थ सूर्यवंशी, रेहान पटेल, ऋषिकेश खेडकर व आदेश चव्हाण या चार खेळाडूंना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. त्याच प्रमाणे या स्पर्धेत (सुवर्णपदक) विजेते खेळाडू– जोया शेख, जिया पटेल, श्रुती भैस, स्वरांजली गाडेकर, अदिती होल, रेहान पटेल, राजवीर सारवान, अथर्व बेद्रे, समर्थ सूर्यवंशी, प्रणव दराडे, आशिष थोरात, नबील पटेल, सुमित खेडकर, ऋषिकेश खेडकर, विराज गांगुर्डे, आदेश चव्हाण, अविनाश गोल्हार, हरी बांगर, सोहेल सय्यद यांनी फरक पटकावले तर (कास्य) पदक विजेते– सना शेख, अदिती आदमाने, आदिती थोरात, मेबल सदाफुले, हुमैरा अन्सारी, अरमान शेख, आदित्य घुमरे, ईश्वर आघाव, रोहन दुशिंग, रुद्र अकोलकर यांनी फरक पटकावले तर (रौप्य) पदक विजेते खेळाडू– श्रद्धा मुळे, अभिरुची अनोळे, ओवी यादव, भूमी यादव, प्रणिती इघे, प्रज्वल अनोळे, तैमूर सय्यद, शौर्य झावरे, मृत्युंजय शिंदे, अथर्व जाधव, आदित्य पुजारी या सर्व खेळाडूंना अचीवर्स स्पोर्ट्स अकैडमी चे अध्यक्ष व मुख्य प्रशिक्षक सेन्सेई आदित्य क्षीरसागर, सचिव सेन्सेई आशिष केदारी, उपाध्यक्ष सेन्सेई कुशल मेस्त्री, सहप्रशिक्षक आदिती होले, प्रसाद निर्मल, ओंकार नर्हे, कृतिशा बोर्डे या प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंचे सर्व पालक वर्गात व संपूर्ण अहिल्यानगर शहरात कौतुक होत आहे. सर्व खेळाडूंना अहिल्यानगर कराटे असोसिएशन व अचिवर्स स्पोर्ट्स अकॅडमी च्या वतीने अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले व सर्व खेळाडूंचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## खोट्या शिक्षकांवर तात्काळ कारवाई करण्याचा इशारा

**● नगर । वीरभूमी–**

घटस्फोटीत, पारित्यक्ता या सवलती खाली संवर्ग एक मध्ये बदलीचा लाभ घेण्याकरिता अर्ज करणाऱ्या सर्व शिक्षकांची सत्यता तपासणी शिक्षकांची माहिती नोंद सेवा पुस्तकात घ्यावी व खोट्या शिक्षकांवरती कारवाई करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या वतीने सामाजिक न्याय विभाग तालुका अध्यक्ष चंद्रशेखर रावसाहेब पंचमुख यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांना निवेदन दिले होते या निवेदनाची दखल घेऊन सर्व शिक्षकांच्या अर्जांना स्थगिती देण्यात आली असून जे दोषी शिक्षक असतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात येईल व पारित्यक्ता प्रधान क्रमांक करिता बदलीने लाभ घेणारे प्राथमिक शिक्षकांबाबत पारित्यक्ता त्याबाबत निश्चित कोणता दस्त पुरावा ग्राह्य धरावा याबाबत पुढील मार्गदर्शन होणार असल्याचे पत्रात पाठवले असल्याचे पत्र जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी यांनी दिले आहे. या महिला शिक्षिका शासनाची फसवणूक करतात याकरिता या सर्वांची निपक्षपातीपणे चौकशी करून कागदपत्र पाहून दोषीवर तात्काळ गुन्हे दाखल करावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली होती.

# महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रा शिर्डी-कोपरगावात दाखल

### आ. आशुतोष काळेंनी हजारो कार्यकर्त्यांसह मोठ्या उत्सहात केले स्वागत

**● कोपरगाव । वीरभूमी–**

राज्यात प्रथमच राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने संपूर्ण राज्यात संयुक्त महाराष्ट्राच्या ६५ व्या वर्ष स्थापना दिनानिमित्ताने महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रा काढण्यात आल्या असून मुंबई येथे १ मे रोजी गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. हि महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रा शिर्डी–कोपरगाव येथे आली असता आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव व शिर्डी मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत या यात्रेचे स्वागत केले.

राज्याच्या जडण घडणीत अजोड योगदान देणाऱ्या थोर व्यक्तींच्या कार्याची आठवण म्हणून महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे ते ४ मे दरम्यान मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने 'गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे' भव्य आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रात 'महाराष्ट्र गौरव' मंगल कलश रथ यात्रा काढण्यात आली आहे. या मंगल कलश रथ यात्रेत महाराष्ट्राच्या प्रत्येक भागातील महापुरुषांच्या वास्तव्याने समृद्ध झालेल्या प्रदेशांतील माती व पाणी मंगल कलशांमध्ये एकत्रित करण्यात येत आहे. ही मंगल कलश यात्रा बुधवार (दि.३०) रोजी शिर्डी–कोपरगावमध्ये आली असता आ.आशुतोष काळे यांनी 'महाराष्ट्र गौरव' मंगल कलश रथ



यात्रेचे स्वागत केले.

यावेळी कोपरगाव व शिर्डी येथील विविध धार्मिक स्थळांच्या भूमीतील पवित्र माती व पवित्र जल या मंगल कलशामध्ये अर्पित करण्यात आले. यामध्ये गोदावरी, प्रवरा व मुळा नदीचे पवित्र जल तसेच श्री साईबाबा मंदिर शिर्डी व कोपरगाव तालुक्यातील ओम गुरुदेव विश्वात्मक जंगलीदास महाराज आश्रम, राष्ट्रसंत जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज मंदीर, दैत्यगुरु शुक्राचार्य व संत जगनाडे महाराज मंदिर कोपरगाव या ठिकाणची पवित्र माती मंगल कलशामध्ये भरून शिर्डी शासकीय विश्राम गृह ते श्री साईबाबा मंदिर परिसरापर्यंत टाळ मृदुंगांच्या गजरात सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी हजारो कार्यकर्त्यांच्या समवेत आ. आशुतोष काळे स्वत: कलश हातात घेवून मिरवणुकीत सहभागी झाले. शिर्डी येथील श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेवून हे कलश आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते मंगल कलशात अर्पण करण्यात येवून 'महाराष्ट्र गौरव' मंगल कलश रथ यात्रा पुढील प्रवासासाठी मुंबईच्या दिशेने रवाना झाली.

याप्रसंगी बोलतांना आ. आशुतोष काळे पुढे म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर संयुक्त महाराष्ट्राच्या ६५ व्या वर्ष स्थापना दिनानिमित्ताने महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रा काढण्यात आल्या आहेत. या निमित्ताने आपल्या महाराष्ट्राची परंपरा व जगावेगळी असलेली संस्कृती जपण्याचा व आपल्या वैभवशाली इतिहासातून या भूमीच्या महापुरुषांचा वारसा पुढे घेवून जाण्याचा उद्देश सार्थ होवून महाराष्ट्राचा अमृत कलश असाच पुढे पुढे जात राहील असे त्यांनी सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस रविंद्र पाटील, विद्यार्थी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, मा.आ. लहु कानडे, शिर्डी लोकसभा कार्याध्यक्ष अशोक कानडे, युवक जिल्हाध्यक्ष कृष्णा आढाव, बाबासाहेब कोते, कोपरगाव राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, शहराध्यक्ष सुनील गंगुले, युवक अध्यक्ष नवाज कुरेशी, कार्याध्यक्ष संतोष चवंडके, रमेश गवळी, बाळासाहेब रुईकर, अशोक आव्हाटे, डॉ. कुणाल घायतडकर, प्रकाश दुशिंग, आकाश डागा, ॲड.मनोज कडू, युवक तालुकाध्यक्ष शशिकांत देवकर, युवक शहराध्यक्ष नवाज कुरेशी, राहाता तालुकाध्यक्ष संदीप सोनवणे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व सलग्न संस्थांचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती, संचालक, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक आदींसह शिर्डी व कोपरगाव व राहाता मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भिंगारच्या सौरभ नगर येथील हरिनाम सप्ताहात भाविकांची मोफत आरोग्य तपासणी

**● नगर । वीरभूमी–**

भिंगार, सौरभ नगर येथील श्री साई मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. सप्ताहाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत स्नेहालय संचलित केरिंग फ्रेंड हॉस्पिटल एंड रिसर्च सेंटरच्या वतीने कै. रमेश राजाराम मडावी यांच्या स्मरणार्थ भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा लाभ पंचक्रोशीतील भाविकांनी घेतला. यंदा सप्ताहाचे ३० वे वर्ष होते.

आरोग्य शिबिराच्या पार्श्वभूमीवर ह.भ.प. रेखाताई मडावी, हरदिन मॉर्निंग ग्रुपचे अध्यक्ष संजय सपकाळ, मनोज देशपांडे, साजन शेंडे, डॉ. गणपत वसावे, डॉ. अतुल मडावी, पूजा मडावी, श्रध्दा गायकवाड, शितल धोंगडे, ह.भ.प. अनावडे महाराज आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

रेखाताई मडावी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, धार्मिक कार्यक्रमासह आरोग्यसेवेचा उपक्रम जोडल्यामुळे नागरिकांमध्ये आरोग्याबद्दलची जागरूकता वाढते. स्वतःहून तपासणी न करणाऱ्या नागरिकांसाठी हे शिबिर आधार ठरत आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्यावरच त्याचे आयुष्य आणि समाजाची उन्नती अवलंबून असते. त्यामुळे अशी आरोग्य शिबिरे म्हणजे प्रत्येकाच्या जीवनाला नवसंजीवनी देणारा उपक्रम असल्याचे स्पष्ट केले.

संजय सपकाळ म्हणाले की, आरोग्य सेवा ही देखील ईश्वर सेवाच आहे. गंभीर आजार होण्यापूर्वीच विविध तपासणी करुन ते आजार ओळखणे गरजेचे आहे. वेळेवर तपासणी केल्यास गंभीर आजारांपासून बचाव होतो. अशा उपक्रमांमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही आरोग्यसेवेचा लाभ मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

या शिबिरात शारीरिक तपासणी, नेत्र तपासणी, कान–नाक तपासणी, स्त्रीरोग तज्ज्ञांच्या सल्ल्याने महिलांची आरोग्य तपासणी, बालकांची तपासणी, रक्तदाब, रक्तातील साखर प्रमाण, रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. गरजूंना मोफत औषध वाटपही करण्यात आले.

## गौतम पब्लिक स्कूलच्या वैष्णवी पवार हिने जिंकली राज्यस्तरीय सिलंबम स्पर्धा

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पब्लिक स्कूलची इयत्ता नववी ची विद्यार्थिनी कु.वैष्णवी ज्ञानेश्वर पवार हिने राज्यस्तरीय शालेय सिलंबम स्पर्धा (१७ वर्ष मुली वयोगट) जिंकून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे अशी माहिती शाळेचे प्राचार्य नूर शेख यांनी दिली आहे. स्पर्धेची विजेती वैष्णवी व तिचे पालक विनोद पवार यांचा शाळेचे प्राचार्य नूर शेख व रईसा शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व हाऊस मास्टर्स उपस्थित होते.

राज्यस्तरीय शालेय सिलंबम स्पर्धा २८ ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान निमगाव कोऱ्हाळे, शिर्डी येथे पार पडली. या स्पर्धेत राज्यभरातून विविध विभागातील १५० स्पर्धक सहभागी झाले होते. कु. वैष्णवी पवार हिने आपल्या कौशल्यपूर्ण व नेत्र दीपक



खेळाचे प्रदर्शन करून विजेतेपद पटकावले.

गौतम पब्लिक स्कूलमध्ये शाळेचे प्राचार्य नूर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिकेट, हॉकी, फुटबॉल, बास्केटबॉल, हॉलीबॉल, बेसबॉल आदी खेळांचे व्यवसायिक प्रशिक्षण दिले जाते. त्या कामी आवश्यक आत्याधुनिक सोयी–सुविधा संस्थेचे मॅनेजमेंट उपलब्ध करून देत असल्याची माहिती प्राचार्य नूर शेख यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष माजी आ. अशोकराव काळे, संस्था विश्वस्त आ. आशूतोष काळे, सचिव सौ. चैतालीताई काळे, व्हा. चेअरमन छबुराव आव्हाड, सर्व संस्था संचालक, प्राचार्य नूर शेख आदींनी कु. वैष्णवी पवार व तिचे प्रशिक्षक इसाक सय्यद व गौरी बारवकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कु. वैष्णवी पवार हीस क्रीडा संचालक सुधाकर निलक, सीलम्बम प्रशिक्षक गौरी बारवकर, क्रिकेट प्रशिक्षक इसाक सय्यद, हॉकी प्रशिक्षक रमेश पटारे, व्हॉलीबॉल प्रशिक्षक राजेंद्र आढाव, प्रकाश भुजबळ, उत्तम सोनवणे, नसिर पठाण, सोपान गांगुर्डे आदींचे मार्गदर्शन लाभले.

# व्यक्तीगत लक्ष आणि एआय तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातुन एकरी ऊस उत्पादनांत हमखास वाढ

### बिपीनदादा कोल्हे । धामोरी येथील प्रगतशिल शेतकरी कैलास माळी यांच्या शेतावर ऊस लागवडीच्या प्लॉटची पाहणी

**● कोपरगाव । वीरभूमी–**

माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी कमी खर्चात अधिक उत्पादन कसे मिळेल हा ध्यास घेत काम केले त्याचाच अवलंब संजीवनीच्या कार्यक्षेत्रात सातत्याने सुरू आहे, शेतकऱ्यांचे व्यक्तीगत लक्ष आणि एआय (कृत्रिम युध्दीमत्ता) तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातुन एकरी उस उत्पादनांत हमखास वाढ होते असे प्रतिपादन संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी केले.

तालुक्यातील धामोरी येथील सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष, प्रगतशिल शेतकरी कैलास माळी यांच्या शेतावर कृत्रिम बुध्दीमत्ता व आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उस लागवडीच्या प्लॉटची पाहणी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक व संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिनदादा कोल्हे यांचे प्रमुख उपस्थितीत नुकतीच करण्यांत आली त्याप्रसंगी ते बोलत होते. बारामती ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट अंतर्गत गेल्या दोन वर्षापासुन उस उत्पादन वाढीसाठी एआय तंत्रज्ञानाची मदत कार्यक्रम सुरू असुन पहिल्या टप्प्यातील शेतकऱ्यांचे निष्कर्ष चांगल्या पध्दतीने मिळाले आहे.

ते पुढे म्हणाले की, ए आय तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होऊन प्रति एकरी उसाचे उत्पादन वाढणार आहे तसेच महाराष्ट्र राज्यात ऊस पिकात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आंतरपिके घेतली आहेत त्याबाबतचे शास्त्रशुद्ध मार्गदर्शन या एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मिळावे. ऊस लागवडीखालील क्षेत्रफळात जगात भारत देश सर्वात मोठा आहे, मात्र प्रति हेक्टरी उत्पादकतेत आपण मागे आहोत. तामिळनाडूपेक्षा महाराष्ट्र राज्य उस उत्पादनांत पिछाडीवर आहे. कमी उत्पादकतेसाठी जमीनीचे आरोग्य, खत व पाण्याचा असंतुलीत वापर, वातावरणांतील चढ उतार ही प्रमुख कारणे आहेत. या करीता शेतकऱ्यांनी कृत्रिम बुध्दीमत्ता व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत ऊस लागवड केल्यास उत्पादनांत ३० ते ४० टक्के वाढ होवुन खर्चात ३० टक्के बचत होते. कैलास माळी यांच्यासह धामोरी गावात तीन एकर क्षेत्रावर ऊस लागवड करण्यांत आली त्याची पाहणी समाधानकारक आहे. शेतकऱ्यांची ऊस पीक कर्ज मर्यादा वाढत आहे तर दुसरीकडे उस उत्पादकता कमी होत आहे. एआय (कृत्रिम बुध्दीमत्ता) तंत्रज्ञानाच्या मदतीने हे चित्र बदलण्यांस मदतच होणार आहे. शेतकऱ्यांनी या प्रभावी तंत्रज्ञानाच्या वापरातुन प्रति एकरी ८० मे. टन उसाचे उत्पादन घ्यायचेच आहे असा चंग बांधावा. १५ मे नंतर हुमणी अळीचे भुंगेरे बाहेर पडतात ते गोळा करण्यासाठी सर्वांनी लाईट ट्रॅप शेतात लावावा यामुळे हुमणी किडीचे नियंत्रण करण्यासाठी मदत होईल असेही ते म्हणांले.

प्रारंभी प्रगतशिल शेतकरी अशोकराव भाकरे यांनी प्रास्तविक केले. कारखान्याचे उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे व संचालक सहकाऱ्यांनी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे



सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली प्रति एकरी ऊस उत्पादनांत वाढीसाठी कारखान्यामार्फत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली, शेवटी कैलास माळी यांनी आभार मानले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

## पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चिंचोंडी येथील आनंद तीर्थावरील जैन धर्मीयांचा

# अक्षयतृतीया वर्षीतप पारणा महोत्सव सादगीपुर्ण वातावरणात संपन्न

**● पाथर्डी । वीरभूमी-**

प्रथम तिर्थंकर भगवान ऋषभदेवांनी या देशाला सर्वप्रथम कुटुंब व्यवस्था, राज व्यवस्था, समाज व्यवस्था, शेती, व्यापार व धर्म व्यवस्था निर्माण करून आत्मनिर्भरता शिकवली. भगवान ऋषभदेव इतिहास निर्माता व युगप्रवर्तक होते. दुष्टांना शांततेची भाषा समजत नसेल तर प्रसंगी स्वसंरक्षणासाठी शस्त्र ही हाती घ्यावे लागते ही शिकवण देणारे प्रथम भगवान ऋषभदेव होय. क्षात्रतेज शिकवणारे भगवान ऋषभदेव होते. या देशाचा दैदिप्यमान इतिहास व स्वाभिमान आपण विसरत चाललो आहोत. आपण आपल्या इतिहासाचा, आध्यात्माचा, परंपराचा, संस्कृतीचा गर्व बाळगायला हवा. अक्षय तृतीयेच्या दिवसाला मोठे अध्यात्मिक महत्त्व आहे. याच दिवशी राजा श्रेयांसकुमार यांच्या इक्षुरसाने (उसाच्या रसाने) भगवान ऋषभदेवांच्या तेरा महिन्याच्या कठोर तपाची सांगता झाली. ही महान परंपरा आजही वर्षीतप करणारे तपस्वी पुढे चालवत आहेत. असे प्रतिपादन उपाध्याय श्री प्रविणऋषीजी यांनी केले. ते चिचोंडी येथील बाराव्या अक्षयतृतीया वर्षीतप पारणा महोत्सवात बोलत होते.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची जन्मभूमी चिचोंडी येथे साकारत असलेल्या भव्य आनंद तीर्थावर यावर्षी उपाध्याय प्रवीण ऋषीजी यांच्या प्रेरणेने अखंडपणे बाराव्या वर्षी हा अक्षयतृतीया वर्षीतप पारणा महोत्सव आयोजित करण्यात आला होता.

जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर हा सोहळा अत्यंत साध्यापणाने, सादगीपूर्ण व धार्मिक वातावरणात पार पडला. तपस्वींची वरघोडा मिरवणूक, संगीत रजनी भक्ती संध्या आदी कार्यक्रम स्थगित करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर परमपूज्य मुकेशमुनिजी म.सा., मधुरगायक पूज्य हितेशमुनिजी म.सा., जैन साध्वी महासती कंचनकंवरजी म.सा. महासतीजी सुनंदाजी, पूज्य आदर्शज्योतीजी, महासती सुप्रियदर्शनाजी, महासती ओजसदर्शनाजी म.सा. आदी ४० जैन संत व साध्वीवृंद उपस्थित होते. गुरु आनंद फाउंडेशनचे अध्यक्ष सतीश सुराणा, मदनलाल देसर्डा, आनंदकुमार (राजुशेठ) चोरडिया, रविंद्र नहार, संतोष शेटीया, विजय समदडीया, अशोक पितळे, नितीन बाफना, संजय गुगळे, सचिन देसर्डा, बाबुशेठ बोरा, सुभाष मुथा, किरण बोरा, अनिल नहार आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.

सकाळी धार्मिक अनुष्ठानात व अतिशय मंगलमय वातावरणात कार्यक्रमाची सुरुवात झाली. पुढे बोलताना आनंदतीर्थाचे प्रणेते, उपाध्याय प्रविणऋषीजी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना या तिर्थ निर्माणाचा उद्देश सांगितला. हे तिर्थ लवकरच जैन धर्मियांचे जागतिक प्रेरणास्थळ व मार्गदर्शन केंद्र होणार असल्याचे सांगितले. या तीर्थाला जैन धर्मीयांचे जगातील सर्वोच्च श्रद्धा केंद्र बनविण्याचे आवाहन केले.

यावेळी आनंदतीर्थचे विश्वस्त सतिश सुराणा यांनी या तीर्थासाठी तन-मन-धनाने सहकार्य करणार्या दानवीरांचा उल्लेख करत आनंद फाउंडेशन च्या वतीने सन्मान केला.

यावेळी येथे साकारत असलेल्या विविध उपक्रमांसाठी अनेक दानशूर व्यक्तींनी करोडो रुपयांची दानराशी जाहीर केली. हजारो जैन धर्मियांच्या साक्षीने पार पडलेल्या या वर्षीतप



पारणा महोत्सवामध्ये देशाच्या विविध राज्यांतील सुमारे ५०० तपस्वींनी सहभाग घेतला. तसेच या कार्यक्रमासाठी भाविकही मोठ्या संख्येने जमले होते.

या पारणा महोत्सवाच्या कार्यक्रमाचे लाभार्थी चिंचवड निगडी प्राधिकरण येथील ज्योत्स्नाबाई रतीलालजी मुथ्था परिवार व निलम राहुलकुमारजी मुथ्था परीवार यांच्या वतीने तपस्वींचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आनंद तिर्थ परीवार, आनंद फाउंडेशन, आनंद भक्त परीवार, पंचक्रोशीतील भक्त परीवार, महीला मंडळ, अर्हम विज्जा ग्रुप यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी चेन्नई, बंगलोर, म्हैसूर, जयपूर, जोधपूर, हैदराबाद, रायपुर, पुना व महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील हजारो भक्त उपस्थित होते. आज इक्षुरसाचे महत्त्व असल्याने सर्व भाविकांना इक्षुरसाचे वाटप व नंतर महाप्रसाद देण्यात आला.

# चार-पाच नंबर साठवण तलाव जोडणी काम जलद गतीने पूर्ण करा : आ.आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी-**

कोपरगाव शहरातील नागरीकांना नियमित पाणी मिळावे यासाठी सुरु असलेल्या चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीचे काम तातडीने पूर्ण करा अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना व सबंधित ठेकेदारास दिल्या आहेत.



आ. आशुतोष काळे यांच्या भगीरथ प्रयत्नातून पाच नंबर साठवण तलावाची निर्मिती झाली. त्यामुळे कोपरगाव शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या एक ते चार साठवण तलावांचा भार हलका होवून नागरीकांना मोठा दिलासा मिळाला आहे. परंतु नागरीकांना नियमित व पूर्ववत पाणी पुरवठा कसा करता येईल यासाठी आ. आशुतोष काळे यांचा सातत्याने खटाटोप सुरु असून त्या खटाटोपातून चार व पाच नंबर साठवण तलाव जोडण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाचा आ. आशुतोष काळे यांनी नुकताच आढावा घेत माहिती घेतली.

ज्याप्रमाणे पाच नंबर साठवण तलावाचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत आ. आशुतोष काळे या साठवण तलावाच्या कामावर बारीक लक्ष ठेवून होते त्याप्रमाणेच सुरु असलेल्या चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीच्या कामावर ते बारीक लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे त्यांनी प्रत्यक्ष भेट देवून सुरु असलेल्या कामाबाबत माहिती घेत लवकरात लवकर काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. गुरुवार (दि.०१) पासून गोदावरी कालव्यांना उन्हाळी आवर्तन सोडण्यात येणार आहे. त्यामुळे येणाऱ्या आवर्तनातून सर्वच्या सर्व एक ते पाच साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरून घेण्यासाठी सुरु असलेले काम लवकरात लवकर होणे गरजेचे आहे. जेणेकरून कोपरगाव शहरातील नागरिकांना नियमित व पूर्ववत पाणीपुरवठा करण्यासाठी चार नं. साठवण तलावातून पाच नं. साठवण तलावात व पाच नं. साठवण तलावातून चार नं. साठवण तलावात पाणी उचलणे सहज शक्य होणार आहे. त्यासाठी हे काम लवकर पूर्ण करा अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना व सबंधित ठेकेदारास दिल्या आहेत.

# कोपरगांव मतदारसंघ भारतीय जनता पार्टीच्या अध्यक्षपदी विशाल गोर्डे, सुनिल कदम तर शहराध्यक्षपदी वैभव आढाव यांची निवड

**● कोपरगाव । वीरभूमी-**

तालुका भारतीय जनता पार्टीच्या तालुकाध्यक्षपदी विशाल गोर्डे (पुर्व भाग), सुनिल कदम (पश्चिम भाग) तर शहराध्यक्षपदी वैभव आढाव यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यांत आली आहे.या निवडी होण्यासाठी भाजपाचे जिल्हा निवडणुक प्रमुख राजेंद्र गोंदकर हे अध्यक्षस्थानी होते. कोपरगाव भाजपा कार्यालयात नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी सत्कार केला. तसेच मावळते अध्यक्ष कैलास राहणे, शहराध्यक्ष दत्तात्रय काले यांचा सत्कार केला. प्रारंभी पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली वाहण्यांत आली.




बिपीनदादा कोल्हे याप्रसंगी बोलतांना म्हणाले की, भारतीय जनता पक्ष देशात सर्वात मोठा पक्ष असुन कोपरगांव शहरासह तालुक्यात या पक्षाची ध्येय धोरणे तळागाळात पोहोचविण्यांसाठी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी जोमाने काम करावे, देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ पासुन भारतीय जनता पक्षाला संघटनशक्तीच्या जोरावर सर्वोच्चस्थानी नेले आहे. त्यांच्या मन की बात मधुन ते सर्वच घटकांच्या प्रगतीचा उहापोह करून युवाशक्तीला दिशा देण्याचे काम करत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे हात बळकट करून शासकीय योजनांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी सर्व प्राथमिक सदस्य, बुथप्रमुखासह सर्वच भाजप घटकांनी काम करावे. माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी या मतदार संघात कार्यकत्यांचे जाळे घट्ट विणलेले आहे. माजी आमदार सौ. स्नेहलताताई कोल्हे यांनीही भारतीय जनता पक्षाच्या माध्यमांतुन महिलाशक्तीसह तालुक्यातील विविध घटकांना एकत्रीत करून त्यांच्या विकासात योगदान दिलेले आहे.

नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष विशाल गोर्डे व सुनिल कदम सत्कारास उत्तर देतांना म्हणाले की, युवानेते व राज्य सहकारी साखर संघाचे संचालक विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनांखाली कोपरगांव तालुका भारतीय जनता पार्टीचा अध्यक्ष म्हणून सदस्यांची वीण अधिक मजबुत करून येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत पक्षाची ध्येयधोरणे पोहोचवुन विजयश्री खेचुन आणू. शहराध्यक्ष वैभव आढाव म्हणाले की, येणारा पुढचा काळ संघर्षांचा आहे. भारतीय जनता पक्ष या ताकदीच्या बळावर बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांचे जेथे जेथे सहकार्य लागेल ते घेवुन काम करू.

प्रारंभी विक्रम पाचोरे यांनी प्रास्तविक केले. सुत्रसंचलन दिपक चौधरी यांनी केले तर बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहोम यांनी आभार मानले.

याप्रसंगी राजेंद्र सोनवणे, बाळासाहेब नरोडे, विजय आढाव, प्रदिप नवले, नारायण अग्रवाल, दादासाहेब नाईकवाडे, सिध्दार्थ साठे, रविंद्र लचुरे, खालीलभाई कुरेशी, सतिष रानोडे, आण्णा खरोटे, हुसेन सय्यद, रोहित कनगरे, हाजी फकीरमहंमद पहिलवान, आबा नरोडे, चंद्रकांत वाघमारे, श्रीकांत नरोडे, कैलास सोमासे, रवींद्र देवडे, सुजल चंदनशिव, भाजपा दिव्यांग सेलचे तालुकाध्यक्ष मुकुंद काळे, प्रकाश गोरडे, प्रकाश दवंगे, मनोज इंगळे, वैभव कुलकर्णी, राजेंद्र बडे, सोपान चिने, रामदास शिंदे, उत्तम कदम, पोपट बोर्डे, कचेश्वर माळी,यमनाथ ठाणगे, जगन्नाथ भारती, नितीन सावंत, बाळासाहेब पाचोरे गणेश थोरात, सुधीर वाकचौरे, सतीश निकम, प्रशांत टेके, दिनेश निकम, जयराम सांगळे, हेमंत धोत्रे यांच्यासह विविध संस्थांचे आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, भाजपा सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रतनवाडी ग्रामपंचायतीच्यावतीने रखडलेल्या वीजपुरवठा कामा विरोधात ठिय्या

**● अकोले । वीरभूमी-**

अकोले तालुक्यातील रतनवाडी येथील पेसा ग्रामपंचायतच्या वतीने पुकारलेले ठिय्या आंदोलन दुपारी चार वाजता अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर मागे घेण्यात आले असून सदर रतनवाडीच्या कामाचा प्रश्न पाच दिवसात मार्गी लावण्याचे लेखी आव्हान राजुर विकास प्रकल्प कार्यालय व वीज महामंडळाकडून देण्यात आले आहे.

अकोले तालुक्यातील रतनवाडी येथील ग्रामपंचायतचा पेसा अंतर्गत वाड्या व वस्त्या ४० वर्षापासून अंधारात आहेत. सदर वाड्या व वस्त्यांवर विद्युतीकरणाचे काम करण्यात यावे यासाठी रतनवाडी ग्रामपंचायतच्या सरपंच सौ धनश्री संदीप झडे यांनी वारंवार कागदपत्रांचा पाठपुरावा राजूर आदिवासी विकास प्रकल्पाकडे केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आल्यानंतर राजुर आदिवासी विकास प्रकल्पाकडून निधी उपलब्ध करून सदर निधी विज महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आला होता. तरीसुद्धा रतनवाडीचे काम मार्गी लागत नव्हते. सदर काम मार्गी लागत नसल्याने रतनवाडीच्या आदिवासी भागात राहणाऱ्या नागरिकांनी कोणत्याही परिस्थितीत रतनवाडीच्या वाड्या व वस्त्या अंधारात राहणार नाही, यासाठी आक्रमक पवित्रा घेतला होता. त्यांनी राजुर येथील आदिवासी विकास प्रकल्पाला वारंवार पत्रव्यवहार करून काम चालू करावे अशी मागणी केली होती. मात्र त्यांच्या मागणीच्या निवेदनांना राजुर आदिवासी विकास प्रकल्प हे केराची टोपली दाखवत होते. व आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय रतनवाडीच्या मागणीकडे दुर्लक्ष करताना दिसून आले. शेवटी राजुर येथील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयावर रतनवाडीच्या सरपंचासह नागरिकांनी सोमवारी बेमुदत ठिया आंदोलन सुरू केले. या आंदोलनाला साथ देण्यासाठी वाघ्या मुरळींनी आपली उपस्थिती लावत कार्यक्रम सादर केला.



रतनवाडीच्या नागरिकांनी सोमवारच्या ठिय्या आंदोलनाला आपल्या मागण्यां जोपर्यंत मान्य होत नाही तोपर्यंत आम्ही राजुर विकास प्रकल्प कार्यालयातून हलणार नसल्याचे रतनवाडीच्या नागरिकांनी ठामपणे सांगितले होते. शेवटी दुपारी एक वाजता आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रमुख देवकन्या बोकडे यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. मात्र जोपर्यंत रतनवाडीच्या वाड्या व वस्त्यांवर विजेचा प्रकाश पोहोचत नाही तोपर्यंत आम्ही जाणारच नाही असा ठाम निर्धार केला. आमचे काम तातडीने सुरू करण्याचे लेखी आश्वासन दोन्ही कार्यालयांनी द्यावे असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे होते. शेवटी दुपारी चार वाजता आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रमुख देवकन्या बोकडे यांनी पाच दिवसाच्या आत रतनवाडीचा विजेचा प्रश्न मार्गी लावला जाईल असे लेखी आश्वासन दिले. तर वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या पाच दिवसाच्या लेखी आश्वासनाच्या बोलीवरच आंदोलन करते शांत झाले. सदर आंदोलनाच्या वेळी रतनवाडीच्या सरपंच सौ धनश्री संदीप झडे, संदीप झडे, मंदा बांडे, स्वप्निल धांडे, अनंत घाणे यांनी या आंदोलनाचे प्रतिनिधित्व केले होते. आंदोलन सुरू असताना यांनी अतिशय आक्रमक पवित्रा घेत रतनवाडीला न्याय मिळवून देण्याचा एक यशस्वी प्रयोग राबविला. सदर आंदोलनासाठी सरपंच धनश्री संदीप झडे, भरत चिंधू झडे, घनश्याम निवृती झडे, शिवाजी बुधा झडे, हरी चेंडू झडे, संदिप देवराम झडे, दशरथ तुकाराम झडे, नवसु किसन झडे, राजेंद्र चंदर झडे, अनिल श्रावणा झडे, नामदेव विठ्ठल झडे, नंदा बांडे, सारीका भांडकोळी यांच्यासह रतनवाडीचे असंख्य नागरिक आंदोलनाला उपस्थित होते.

> भंडारदऱ्याच्या आदिवासी भागामध्ये वाड्या वस्त्यांवरील विद्युतीकरण जर पाच दिवसाच्या आत राजुर आदिवासी विकास प्रकल्प व विज महामंडळ यांनी सुरू केले नाहीतर याहीपेक्षा उग्र आंदोलन या आदिवासी भागातुन सर्व गावांमधील नागरीक राजुर येथील आदिवासी विकास प्रकल्पावर येऊन करतील.
>
> – **बच्चु गांगड,** सरपंच, उडदावणे